आतापर्यन्त वेगवेगळ्या अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शन केसे केले जाते या संबंधीचे निष्कर्ष, निरीक्षण, प्रवाह तक्ते व प्रश्नावल्यांना मिळालेले प्रतिसाद यांच्या विश्लेषणावरुन काढण्यात आले. या सर्व निष्कर्षांचा एकत्रित विचार करुन मराठी पद्धतीचे पाठमार्गदर्शन कसे केले जाते याचे चित्र पुढे देण्यात आले आहे. ( अन्य विषयांच्या पाठमार्गदर्शनाची चित्रे परिशिष्ट क्र.१० मध्ये दिलेली आहेत. )

१) <u>मराठी पाठ नियोजन मार्गदर्शनाचे चित्र :</u>

विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण तयार न करताच किंवा त्रोटक टाचण घेऊन मार्गदर्शक प्राध्यापकाकडे मार्गदर्शनासाठी आला तर मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत. तर त्यामध्ये आशय, पद्धती, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शैक्षणिक साधने, मूल्यमापन, अध्ययन-अध्यापन कृतीं याकडे लक्ष देण्यास सांगतात.

पाठ नियोजन मार्गदर्शनाची सुरुवात पूर्वज्ञानापासून करतात. परंतु या घटकावर मर्यादितच चर्चा होते. मार्गदर्शनामध्ये यानंतर प्रेरणा, आशय, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शिक्षक-विद्यार्थी-कृती, शैक्षणिक साधने, संकलन, फलक लेखन, उपयोजन, मूल्यमापन या क्रमाने मार्गदर्शन देतात. या घटकामध्ये विषयज्ञान या घटकावर अधिक व प्रदीर्घ चर्चा करतात. त्यानंतर पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे, शिक्षक कृती, मूल्यमापन या घटकांवर भर देतात. या घटकांचे मार्गदर्शन स्वतंत्रपणे दिले जाते. तसेच प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचा हेतुत: प्रश्न विचारुन प्रतिसाद घेत नाहीत. त्यामुळे चर्चा दीर्घकाळ न होता लघु चर्चा होते.

पूर्वज्ञानावर जी चर्चा होते त्यामध्ये मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक पाठाचा आशय व पूर्वज्ञान यातील संबंध पाहतात व विद्यार्थीशिक्षकाला प्रेरणा, पूर्वज्ञान, मागील इयत्ता, पाठ-लेखक यावर प्रश्न विचारतात. यासंबंधी मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता आला नाही तर प्राध्यापक त्याला संदर्भीय पुस्तके वाचावयास सांगतात.

प्रेरणे संबंधीच्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी-शिक्षकाला योग्य प्रेरणा देता येत नसल्यास प्राध्यापकांची स्वत: प्रेरणा सुचविण्याची प्रवृत्ती दिसते. या मार्गदर्शनामध्ये मराठी पाठाचे मार्गदर्शक घटकाला अनुरुपता, प्रेरणा देणा-या कृती, प्रस्तावनेची हेतुकथनाशी सांगड व प्रेरणेचा परिणाम यांना या क्रमाने महत्त्व देतात.

पाठ टाचणातील मुद्दे, उपमुद्दयावर चर्चा करतांना प्रथम मुद्दे व उपमुद्दे पाहतात ते नसल्यास मार्गदर्शन देत नाहीत. या घटकावर सर्वात जास्त चर्चा केली जाते. या चर्चेमध्ये विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयाचे स्पष्टीकरण विचारणे, प्रत्येक मुद्दयावर चर्चा करणे, चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देणे अशा स्वरुपाची प्रवृत्ती दिसते. विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण आले नाही तर स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन करतात. चर्चेमध्ये आशय, अपरिचित शब्द , वाक्प्रचार व म्हणी, कल्पना सौन्दर्य, विचार सौन्दर्य, व्यक्तिरेखा या क्रमाने मुद्दयांचा विचार करतात. पाठाचा आशय सविस्तर सांगतात, मात्र पाठय-घटकाशी निगडित आशय, सांगत नाहीत.

उद्दिष्टे व स्पष्टीकरणावरील मार्गदर्शनामध्ये मराठी पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टे पाठय घटकानुसार, नेमकी व योग्य लिहिणे, यासंबंधी चर्चा करतात. घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास ती काढण्यास सांगतात. विद्यार्थी-शिक्षकाने लिहिलेल्या उद्दिष्टांमध्ये बदल करताना त्या मागील कारण स्पष्ट करतात.

मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये शैक्षणिक साधनावर आवश्यक तितकी व मर्यादितच चर्चा केली जाते. त्यामध्ये पाठय-विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचे नियोजन केले नसल्यास ती दाखविण्याचा आग्रह धरतात. त्यांच्या कल्पना सुचविणे, त्यांच्या उपलब्धतेची माहिती देणे अशी प्रवृत्ती दिसते.

त्याचप्रमाणे शिक्षक-कृतीवरील मार्गदर्शनामध्ये आदर्श वाचन, हेतुकथन, आशय व स्पष्टीकरण, प्रश्न, शैक्षणिक साधने या कृती विविधतेवर प्राध्यापक स्वत: मार्गदर्शन करतात. या मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर माहिती देतात. तसेच कथन, स्पष्टीकरण, प्रश्न, विद्यार्थी-सहभाग, शैक्षणिक साधने या क्रमाने मार्गदर्शनात महत्त्व देतात. विद्यार्थी-कृतीमध्ये विशेष चर्चा नाही.

मूल्यमापनावरील मार्गदर्शनात प्रश्न उद्दिष्टानुसार, पाठयांशानुसार असणे प्रश्न रचना, त्याचे स्वरूप, विद्यार्थीकुवत या बाबींवर स्वत: मार्गदर्शन करतात. प्रश्नांचे स्वरुप सांगतात. स्वाध्यायावरील मार्गदर्शनात तो उद्दिष्ट, विषय, वयोगट, पाठयांशाचे दृढीकरण या बाबींनुसार असण्यावर मार्गदर्शन करतात. विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात बदल अपेक्षित असल्यास चर्चेतून बदल करतात.

फलक लेखनावर दिल्या जाणा-या मार्गदर्शनामध्ये मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मुद्दयांचे लेखन, सुवाच्य, शुद्ध, रेखीव लेखन, हेतुकथन या संबंधी मार्गदर्शन करतात. तसेच फलक लेखन दोन भागात करणे व वरील लेखनातील दोषांनुसार सुधारणा सुचविल्या जातात.

पाठ मार्गदर्शन उशिरा घेण्यास येणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकाला दोन दिवस आधी मार्गदर्शन घेण्याची समज देऊन पाठ रद्द करतात. विशिष्ट घटकाच्या मार्गदर्शनास प्राध्यापक जो वेळ देतात त्यानुसार क्रम पाहता, सर्वाधिक वेळ उद्दिष्टे व स्पष्टीकरणावरील चर्चेस देतात. त्यानंतर पाठ्य-मुद्दे, शिक्षक, विद्यार्थी कृती, प्रेरणा, पूर्वज्ञान, फलक लेखन व मूल्यमापन, शैक्षणिक साधन, उपयोजन, संकलन यांना वेळानुसार क्रम दिला जातो. वरील सर्व घटकांकडे लक्ष द्यावे असे मत असते. मार्गदर्शनामध्ये विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात. मात्र अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा अल्प सहभाग घेतात. विद्यार्थी-शिक्षकाचे पाठनियोजन चुकीचे वाटले तर, आहे त्या पाठनियोजनात सुधारणा करतात. त्याचप्रमाणे मार्गदर्शन काळात विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास न रागावता प्रश्न चर्चा करतात. मात्र विद्यार्थी-शिक्षकाकडून अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधने यांचा आग्रह धरतात.

या पाठ मार्गदर्शनामध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक कमी प्रश्न विचारून विद्यार्थी-शिक्षकाला जास्त प्रमाणात बोलू दिले जाते. त्यावर प्राध्यापक होकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतात. काही वेळा नकार व्यक्त करतात, पण तो दीर्घकाळ व्यक्त करतात. या मार्गदर्शनामध्ये प्रामुख्याने अपूर्ण लहान होकारात्मक/नकारात्मक अशा स्वरुपाची कडे मिळतात.

अन्य विषयांच्या पाठमार्गदर्शनाची चित्रे परिशिष्ट क्र.१० मध्ये दिलेली आहेत.

मराठी पाठनियोजन मार्गदर्शनाचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर आता अन्य विषयाशी तुलनात्मक विचार करणे शक्य आहे. तुलनात्मक विचार करताना निरीक्षणे, प्रवाह तक्ते आणि प्रश्नावलीचे प्रतिसाद यातून मिळालेल्या सामग्रीचा उपयोग केला आहे. हा तुलनात्मक अभ्यास विभाग-२ मध्ये सादर करण्यात आलेला आहे.

विभाग-२

## मराठी व अन्य विषयांच्या पाठमार्गदर्शनामधील तुलना

मराठी व अन्य विषयांच्या पाठमार्गदर्शनाच्या तौलनिक अभ्यासासाठी मिळणाऱ्या सामग्रीची तुलना तौलनिक दर्शकांकावरुन केलेली आहे. तसेच प्रश्नावलीत या पद्धतीतील फरकांविषयी विद्यार्थी व प्राध्यापक यांना विचारलेल्या प्रश्नाद्वारेही तुलना या विभागात करणे शक्य झाले आहे.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्र.क्र.४३ व विद्यार्थी प्रश्नावलीतील प्र.क्र.४२ या फरकाविषयीचे आहेत. बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे हे मान्य केलेले आहे.

त्यानुसार कोणते फरक आहेत याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली मते पुढीलप्रमाणे :-

१) मराठी पाठ मार्गदर्शनात प्रश्नावर भर असतो, विषय प्रतिपादनामध्ये प्रश्न-साखळी-दरम्यान स्पष्टीकरण असते व विद्यार्थ्याला अधिक अभिव्यक्तीस प्रवृत्त करणे या बाबींचे मार्गदर्शन द्यावे लागते; तर अन्य विषयांमध्ये स्पष्टीकरण, कथन यावर अधिक भर असतो.

२) मराठी पाठ मार्गदर्शनात हेतुप्रश्न, प्रकट वाचन, मूक वाचन, काव्यगायन, भावनाट्य, शब्द व त्यांच्या अर्थछटा, समानार्थी, विरुध्दार्थी शब्द, वाक्प्रचार त्याचप्रमाणे त्यासाठी उदाहरणे, घटना, प्रसंग यातून परिचय देणे या सर्व बाबींवर सखोल मार्गदर्शन द्यावे लागते. अन्य विषयात अध्यापन मुद्द्यांच्याच संदर्भात मार्गदर्शन असते.

३) वरील प्रमाणेच मराठी पाठ मार्गदर्शनात कल्पनासौंदर्य, शुध्दलेखन यावर लक्षपूर्वक मार्गदर्शन द्यावे लागते. अन्य विषयात महत्त्वाचा मुद्दा, शब्द यांचे लेखन येते.

४) विषय, आशय, पद्धतीनुसार मराठी व अन्य विषय पाठ मार्गदर्शनात फरक आहे.

५) मराठीमध्ये पाठयपुस्तक व पाठयविषय साधन तर अन्य विषयात ते साध्य आहे.

६) मराठी पाठ मार्गदर्शनात, गद्य, पद्य, व्याकरण, निबंध लेखन, पत्रलेखन इत्यादि वर स्वतंत्र पद्धतीने मार्गदर्शन करावे लागते. अन्य विषयात मात्र आशय बदलानुसार मार्गदर्शन, इतर बदल नाहीत.

७) अध्ययन अनुभूतीत बदल, उदा. मराठीमध्ये वाचन, लेखन, कथन, उच्चार, विचारसौंदर्य, प्रश्न, रससौंदर्य, नाट्यीकरण, कवीची काव्य कल्पना या बाबींच्या मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकांना प्रत्यक्ष अनुभूती द्याव्या लागतात. (भाषा सोडून ) इतर विषयात पाठ्यांशांतर्गत ज्ञानाच्या संदर्भात मार्गदर्शन असते.

८) भाषेची उद्दिष्टे व अन्य विषयांची उद्दिष्टे यात फरक आहे. भाषेमध्ये भाषाज्ञान, भाषा आकलन, भाषेचा विकास, भाषाभिव्यक्ती या दृष्टीने मार्गदर्शनात उद्दिष्टे ठरविली आहेत का हे पहावे व सांगावे लागते. अन्य विषयात आशयाचे ज्ञान कितपत गळी उतरणार त्या दृष्टीने उद्दिष्टे ठरतात. उद्दिष्टानुसार मार्गदर्शन पद्धतीत हा फरक आहे. थोडक्यात गद्य, पद्य, व्याकरणानुसार ही उद्दिष्टे ही बदलतात, तसे अन्य विषयात आशयानुसार थोडा फरक करून विशिष्ट उद्दिष्ट्यानुसार मार्गदर्शन असते.

९) मराठी अध्यापन पद्धतीचे मार्गदर्शनात शैक्षणिक साधने, उदाहरणे, शिक्षक कृती व विद्यार्थी कृती यांचे मार्गदर्शन अन्य विषयांचे मार्गदर्शनाहून भिन्न आहे.

१०) मराठी पाठ मार्गदर्शनात अधिक अवांतर वाचन, विविध शब्दसंग्रह त्याचप्रमाणे विविध भाषाशैली, वाङ्मय प्रकार, त्यानुसारच अन्य लेखक व त्यांचे लेखन, लेखन विषय या संबंधी मराठीमध्ये सखोल मार्गदर्शनाची गरज असते. अन्य विषयात असा भाग नाही.

११) भाषेद्वारा ज्ञान व उपयोजनापेक्षाही वृत्ती, जाणीवा, व्यक्तिमत्त्व विकास, संस्कृती परिचय, संस्कृती मेळ यांचे मार्गदर्शन द्यावे लागते. अन्य विषयात आशय परिचय द्यावा लागतो.

१२) भाषेत रस, तर इतर विषयात कार्यकारणसंबंध यानुसार मार्गदर्शनात फरक असतो.

१३) प्रश्न मार्गदर्शनातही फरक पडतो. मराठीमध्ये पाठ्य-पुस्तक समोर असते, त्यानुसार विविध बारीक सारीक पाठ्यांशावर प्रश्न विचारून तो घटक समजावून द्यावयाचा असतो. इतर विषयात तुलनात्मक, विषयाला पूरक प्रश्न विचारून त्या आधारे पाठ्यांतर्गत विषयांचा विकास साधावयाचा असतो.

१४) पाठाच्या पायऱ्यात फरक येतो. मराठी व अन्य भाषा मध्ये प्रेरणा, हेतुकथन, प्रकट वाचन, मूकवाचन, हेतुप्रश्न लेखन काव्य असल्यास गायन असा क्रम येतो. त्यानुसार मार्गदर्शनात फरक आहे. इतर विषयात पाठ्य-मुद्दयानुसार मार्गदर्शन व ठरलेल्या पाठाच्या पायऱ्यानुसार मार्गदर्शन असते.

१५) मराठी पाठ-मार्गदर्शनापेक्षा अन्य विषय यांच्या पाठ-मार्गदर्शनात शैक्षणिक साधने, प्रयोग दिग्दर्शन, निरीक्षण, फलक कार्य याबाबी केव्हा, कशा वापरावयाच्या याचे मार्गदर्शन मराठीपेक्षा अधिक द्यावे लागेल. उदा. शास्त्र, गणित, भूगोल इ.

१६) मराठीत आकृत्या, नकाशे, चित्रे यांचा वापर यासंबंधी मार्गदर्शन कमी अन्य विषयात ते जास्त.

१७) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनात फरक - इंग्रजीमध्ये ड्रिलिंग व रिव्हिजन वर मार्गदर्शन द्यावे लागते. तसेच मराठीत

भाषिक घटक उदा.कल्पना,भाव,नाटय यावर मार्गदर्शन द्यावे लागते तर इंग्रजी परकीय भाषा म्हणून केवळ भाषा परिचयाच्या दृष्टीने मार्गदर्शन घ्यावे लागते.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४४ हा मराठी व अन्य विषय यांच्या पाठ मार्गदर्शनात फरक नसल्यास स्वतंत्र अध्यापन पद्धती ठेवणे व त्याविषयी प्राध्यापकांची मते या विषयीचा आहे. त्याविषयी प्राध्यापकांनी पुढील माहिती दिलेली आहे.

बहुसंख्य प्राध्यापक स्वतंत्र अध्यापन पद्धतीची आवश्यकता नाही असे सांगतात; पण त्याविषयी आपली मते त्यांनी दिलेली नाहीत.

एक मत - स्वतंत्र अध्यापन-पद्धतीची गरज नाही. प्रत्येक विषयांच्या अध्यापन पद्धती आहेत. मराठी व अन्य विषयांच्या अध्यापन-पद्धतीच्या मार्गदर्शनात फरक नाही, म्हणून स्वतंत्र अध्यापन-पद्धती देण्याची गरज नाही. फक्त मराठीसाठी अभिव्यक्ती विकासाला पूरक अशा अध्यापन प्रद्धती असाव्यात.कारण अन्य मार्गदर्शनात फरक नाही .इथून तिथून अध्यापन तंत्र ( मेथडॉलॉजी ) सारखे आहे,फक्त आशयानुसार फरक असतो व त्यानुसार पद्धती बदलतात. मराठीच्या संदर्भात उच्चार, शुध्दलेखन, अभिव्यक्ती यावर भर असतो,अन्य विषयात ज्ञान आकलन यावर भर असतो. प्रश्नावलीनुसार स्पष्ट झालेल्या फरकानंतर दर्शकांकानुसार फरक स्पष्ट करण्यात येत आहेत.

विभाग-२.१

मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनाचे तौलनिक दर्शकांक सारण्यामधील तुलना --

मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शन व अन्य अध्यापन - पद्धतीचे पाठ मार्गदर्शन यांच्या एकत्रित मॅट्रिक्स मधील १९ घटकांच्या टक्केवारीवरुन ' फरकाचा तौलनिक दर्शकांक ' काढला. परिकसन बी.एच. व नोसांकुक टी.ए. (१९९२) आणि बॅाग डी.जे. ( १९६९ ) यांनी दिल्याप्रमाणे पुढील सूत्राचा उपयोग केला.

$$\text{फरकाचा तौलनिक दर्शकांक} = \frac{\text{प्रमाण चलाची टक्केवारी} - \text{तुलना करावयाच्या चलाची टक्केवारी}}{\text{प्रमाण चलाची टक्केवारी}} \times १००$$

प्रस्तुत संशोधन मराठी पाठ मार्गदर्शन पद्धती प्रमाण मानल्यामुळेच हेच सुत्र पुढील प्रमाणे लिहावे लागेल.

$$\text{फरकाचा तौलनिक दर्शकांक} = \frac{\text{मराठी पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी} - \text{अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी}}{\text{मराठी पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी}} \times १८$$

वरील सुत्रानुसार काढलेल्या तौलनिक फरकाच्या दर्शकांकाचे अर्थनिर्वचन परिकसन बी.एच. व नोसांकुक टी.ए. (१९९२ ) यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आले.

० ते ९ टक्के - सामान्यपणे महत्त्वाचा फरक नाही.

१० ते १९ टक्के - अल्प प्रमाणात फरक आहे.

२० ते २९ टक्के - पुरेसा फरक आहे.
३० ते ३९ टक्के - बराच फरक आहे.
४० च्या वर टक्के - खूपच फरक आहे.

मराठी व हिन्दी अध्यापन.
पद्धतीचे पाठ मार्गदर्शन --

मराठी व हिन्दी पाठ मार्गदर्शन घटकातील फरकाचे तौलनिक दर्शांक सारणी क्र. ४·२५५ मध्ये दिलेले आहेत.

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

फरकाच्या तौलनिक दर्शांक सारणीचे निरीक्षण केले असता मराठी व हिन्दी या दोन विषयामध्ये दिल्या जाणाऱ्या पाठमार्गदर्शनाचे चित्र पुढीलप्रमाणे दिसते.

१) शांतता काल - (-३.४४), मूल्यमापन (६.७९ ), स्वाध्याय (६.९१), विद्यार्थी-शिक्षक प्रतिसाद (४.९८ ), अन्य (३.८४ ) या घटकांमध्ये मराठी व हिन्दी पाठमार्गदर्शनामध्ये फरक नाही याचा अर्थ साम्य दिसते.

२) अध्यापनपद्धती (१६.३७ ),शिक्षककृती (१६.९१ ) व मार्गदर्शक प्राध्यापकांचा नकारात्मक प्रतिसाद या घटकामध्ये अल्प प्रमाणात फरक आहे.याचा अर्थ बरेच साम्य आहे.

३) विषय ज्ञान (२१.७२ ) या घटकात पुरेसा फरक दिसतो.

४) प्राथमिक माहिती ( -.३५ ), शैक्षणिक साधन ( ३१.०३ ) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे (२९.०८),विद्यार्थी-कृती (-३८.७५) मार्गदर्शक प्राध्यापकांचा होकारात्मक प्रतिसाद (२९.७५ ) या घटकांमध्ये बराच फरक दिसतो.

सारणी क्र. ~~[illegible]~~ ४.२९५

**मराठी व हिंदी पाठ मार्गदर्शन तुलना**

| घटक → / विषय ↓ | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरण | अध्यापन पद्धती | प्रश्न पद्धती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| मराठी | ०.२९ | २. | १.२७ | २.०३ | ४.१२ | १०.२२ | ६.७४ | २.३२ | २.६७ | ६.६२ | २.०९ | ६.३३ | १.५७ | २.९ | ७.६१ | २३.४७ | १२.९५ | ३.६ | ०.५२ |
| हिंदी | ०.३ | २.७ | २. | १.४ | ५.८ | ८.० | ८.७ | २.७ | २.० | ५.५ | २.९ | ५.९ | १.६ | १.७ | ११.७ | २२.३ | ९.१ | ४.२ | ०.५ |
| तौलनिक टक्केवारीचा दर्शांक | -३.४४ | -३५ | -५७.४८ | ३१.०३ | -४०.७७ | २१.७२ | -२९.०८ | -१६.३७ | २२.०९ | १६.९१ | -३८.७५ | ६.७९ | १.९१ | ४७.३७ | ५३.७४ | ४.९८ | २९.९२ | १६.६६ | ३.८४ |

५) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (-५७.४८), प्रेरणा व हेतुकथन (-४०.७७ ), फलक लेखन (४१.३७), प्राध्यापकांची अपेक्षात्मक कृती (- ५३.७४) या घटकांच्या मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये व हिन्दी पाठ मार्गदर्शनामध्ये खूपच फरक आहे.

निष्कर्ष :

१) मराठी व हिन्दी पाठ मार्गदर्शनाची तुलना करता मूल्यमापन, स्वाध्याय, विद्यार्थी प्रतिसाद या घटकांबाबत मराठी व हिन्दी पाठ मार्गदर्शनात कोणताही फरक नाही. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

२) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, प्रेरणा व हेतुकथन या घटकांबाबत हिन्दी पाठ मार्गदर्शनात मराठीच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

३) मराठी पाठ मार्गदर्शनात प्राध्यापकाच्या अपेक्षात्मक कृतींचे प्रमाण हिंदीच्या तुलनेत जास्त आहे.

४) फलक लेखनावरील चर्चा मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये हिंदीच्या तुलनेत जास्त असते.

५) विषय ज्ञान, शैक्षणिक साधनांचा वापर यावर मराठीत अधिक चर्चा तर प्राथमिक माहिती व विद्यार्थीकृती यावर हिंदीत अधिक चर्चा होते.

६) होकारात्मक प्रतिसादाचे प्रमाण मराठीमध्ये हिंदीच्या तुलनेत जास्त होते.

मराठी व इंग्रजी अध्यापन -
पद्धतीचे पाठ मार्गदर्शन -

मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शन घटकातील फरकाचे तौलनिक दर्शकांक सारणी क्र. ४.२५६ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र. ४.२९६

<u>मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शन तुलना</u>

| घटक → / विषय ↓ | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| मराठी | ०.२५ | २. | १.२७ | २.०३ | ४.१२ | १०.२२ | ६.७४ | २.३२ | २.६७ | ६.६२ | २.०५ | ६.३३ | १.५७ | २.५ | ७.६१ | २३.४७ | १२.५५ | ३.६ | ०.५२ |
| इंग्रजी | ०.४४ | २.१६ | ०.६७ | ०.८२ | २.५३ | ११(४९ | ३.५ | ०.५२ | २.५१ | ७.२३ | १.०४ | ४.५२ | २.७६ | ०.६७ | ११.८६ | २८.१३ | ५.६२ | ८.०५ | ०.५५ |
| तौलनिक टक्केवारीचा दर्शांक | -५१.७२ | -८. | ४७.२४ | ५५.६ | ३८.५५ | -१२.४२ | ४८.०७ | ७७.५८ | -८.५८ | -५.२१ | ५०.२३ | २२.२७ | -७५.७५ | ७६.८५ | -५५.८४ | -१९.८५ | २५.७१ | -१२३.६१ | १३.४६ |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

फरकाच्या तौलनिक दर्शकांक सारणीचे निरीक्षण केले असता मराठी व इंग्रजी या दोन विषयांमध्ये दिल्या जाणाऱ्या पाठ मार्गदर्शनाचे चित्र पुढीलप्रमाणे दिसते.

१) प्राथमिक माहिती (-८.०० ), प्रश्न पद्धती (-८.९८ ), शिक्षककृती (-९.२१ ) या घटकांमध्ये मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनामध्ये फरक नाही. याचा अर्थ साम्य दिसते.

२) विषय ज्ञान (-१२.४२ ), विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (-१९.८५) व अन्य (१३.४६) या घटकांमध्ये अल्प प्रमाणात फरक आहे. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

३) मूल्यमापन (२२.२७ ) व मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद (२५.७१) या घटकांमध्ये पुरेसा फरक दिसतो.

४) प्रेरणा व हेतुकथन (३८.५९ ) या घटकामध्ये बराच फरक दिसतो.

५) शांतता काळ (-५१.७२), विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (४७.२४), शैक्षणिक साधनांचा वापर (५९.६०), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (४८.०७),अध्यापन पद्धती (७७.५८), विद्यार्थीकृती(५०.२३), स्वाध्याय (-७५.७९),फलक लेखन (७६.८९), प्राध्यापकांची अपेक्षात्मक कृती (-५५.८४) मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद (-१२३.६) या घटकांच्या मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनामध्ये खूपच फरक आहे.

## निष्कर्ष :

१) मराठी व इंग्रजी पाठ मार्गदर्शनाची तुलना करता प्राथमिक माहिती,प्रश्न पद्धती,शिक्षककृती,या घटकांच्या पाठ मार्गदर्शनामध्ये साम्य आहे.

२) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, शैक्षणिक साधन, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे, अध्यापन पद्धती, विद्यार्थीकृती, फलक लेखन या घटकांबाबत मराठी पाठ मार्गदर्शनात इंग्रजी तुलनेत अधिक चर्चा होते.

३) स्वाध्यायावरील चर्चा इंग्रजी पाठमार्गदर्शनामध्ये मराठीच्या तुलनेत जास्त होते.

४) इंग्रजी पाठ मार्गदर्शनात प्राध्यापकांच्या अपेक्षात्मक कृती व प्राध्यापकांचा नकारात्मक प्रतिसाद या घटकांचे प्रमाण मराठीच्या तुलनेत जास्त आहे.

५) मूल्यमापन, प्रेरणा व हेतुकथन यावर मराठी पाठ मार्गदर्शनात इंग्रजीच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

६) मार्गदर्शक प्राध्यापकांचा होकारात्मक प्रतिसाद मराठी पाठ मार्गदर्शनात इंग्रजीच्या तुलनेत जास्त होतो.

मराठी व इतिहास अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शन :

मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शन घटकातील फरकाचे तौलनिक दर्शकांक सारणी क्र. ४·२९७ मध्ये दिलेले आहेत.

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

फरकाच्या तौलनिक दर्शकांक सारणीचे निरीक्षण केले असता मराठी व इतिहास या दोन विषयामध्ये दिल्या जाणाऱ्या पाठ मार्गदर्शनाचे चित्र पुढील प्रमाणे दिसते.

१) शांतता काळ (६.८९ ), विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (७.८७ ), विद्यार्थीकृती (९.५६ ), विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (४.५५ ), अन्य (३.८४)

सारणी क्र. ५.२९८

मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शन तुलना

| घटक → / विषय ↓ | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| मराठी | ०.२९ | २. | १.२७ | २.०३ | ४.१२ | १०.२२ | ६.७४ | २.३२ | २.६७ | ६.६२ | २.०९ | ६.३३ | १.५७ | २.९ | ७.६१ | २३.४७ | १२.५५ | ३.६ | ०.५२ |
| इतिहास | ०.२७ | ३.३५ | १.१७ | १.४५ | ३.७४ | १९.५५ | ४.६३ | १.५० | ३.९ | १०.६१ | १.८९ | ३.५१ | १.१७ | १.३४ | ८.९३ | २२.४ | ७.८४ | २.४० | ०.५ |
| तौलनिक टक्केवारीचा दर्शांक | ६.८९ | ६७.५ | ७.८७ | २८.५७ | ९२.२३ | -९१.२९ | ३१.३० | ३५.३४ | -४६.०६ | -६०.२७ | ९.५६ | ४४.५४ | २५.४७ | ५३.७१ | -१७.३४ | ४.५५ | ४२.२३ | ३३.३३ | ३.८४ |

या घटकांमध्ये मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये फरक नाही. याचा अर्थ साम्य दिसते.

२) प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (-१७.३२) या घटकामध्ये अल्प प्रमाणात फरक आहे-याचा अर्थ बरेच साम्य आहे.

३) शैक्षणिक साधनांचा वापर (२८.५७), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (३१.३०), अध्यापनपद्धती (३५.३४), स्वाध्याय (२५.४७), मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद (३३.३३) या घटकांमध्ये बराच फरक दिसतो.

४) प्राथमिक माहिती (६७.५०), प्रेरणा व हेतुकथन (९२.२३), विषयज्ञान (-९१.२९), प्रश्न पद्धती (-४६.०६), शिक्षक कृती (-६०.२७ ), मूल्यमापन (४४.५४), फलक लेखन (५३.७९), मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद (४२.२३) या घटकांच्या मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये खूपच फरक आहे.

निष्कर्ष :

१) मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शनाची तुलना करता विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, विद्यार्थी कृती, विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद या घटकाबाबत मराठी व इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये कोणताही फरक नाही. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

२) प्राथमिक माहिती, प्रेरणा व हेतुकथन, मूल्यमापन, फलक लेखन या घटकाबाबत मराठी पाठ मार्गदर्शनात इतिहासाच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

३) विषयज्ञान, प्रश्न पद्धती, शिक्षककृती या घटकाबाबत इतिहास पाठ मार्गदर्शनात मराठीच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

४) मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद मराठी पाठ मार्गदर्शनात इतिहासाच्या तुलनेत अधिक आहे.

५) शैक्षणिक साधन, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे, अध्यापन पद्धती, स्वाध्याय या घटकावर मराठी पाठ मार्गदर्शनात इतिहासाच्या तुलनेत जास्त चर्चा होते.

६) प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद मराठीमध्ये इतिहासाच्या तुलनेत जास्त होतो.

मराठी व भूगोल अध्यापन - पद्धतीचे पाठ मार्गदर्शन --

मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शन घटकातील फरकाचे तौलनिक दर्शांक सारणी क्र. ४.२९८ मध्ये दिलेले आहेत.

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

फरकाच्या तौलनिक दर्शांक सारणीचे निरीक्षण केले असता मराठी व भूगोल या दोन विषयांमध्ये दिल्या जाणाऱ्या पाठ मार्गदर्शनाचे चित्र पुढील प्रमाणे दिसते.

१) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान(-८.६६), मूल्यमापन(५.२१), स्वाध्याय(४.४५), मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद (-४.७२), अन्य (१.९२) या घटकांमध्ये मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये फरक नाही. याचा अर्थ साम्य दिसते.

२) शांतता काळ (१०.३४), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (१०.२३), विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद १२.४४), मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद ( १४.७४ ) या घटकांमध्ये अल्प प्रमाणात फरक आहे. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

सारणी क्र. ~~[illegible]~~ ४.२१८

मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शन तुलना

| घटक → / विषय ↓ | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| मराठी | ०.२९ | २. | १.२७ | २.०३ | ४.१२ | १०.२२ | ६.७४ | २.३२ | २.६७ | ६.६२ | २.०९ | ६.३३ | १.५७ | २.९ | ७.६१ | २३.४७ | १२.५५ | ३.६ | ०.५२ |
| भूगोल | ०.२२६ | १.४३ | १.३८ | २.८१ | २.२३ | ७.२७ | ६.०५ | १.०६ | ३.३४ | ८.२८ | १.८८ | ६.० | १.६४ | ३.५५ | ११.४१ | २६.३९ | ११.०४ | ३.७७ | ०.५३ |
| तौलनिक टक्केवारीचा दर्शांक | १०.३४ | २८.९ | -८.६६ | ३८.४२ | ४५.८७ | २८.८६ | १०.२३ | ४४.३१ | -२५.०९ | -२५.०७ | २९.१८ | ५.२१ | ४.४५ | -२२.४१ | -४९.५३ | १२.४४ | १४.७४ | -४.७२ | १.९२ |

३) फलक लेखन (-२२.४१ ) या घटकामध्ये पुरेसा फरक आहे.

४) प्राथमिक माहिती (२८.९०), शैक्षणिक साधनांचा वापर (३८.४२), विषय-ज्ञान (२८.८६), प्रश्न पद्धती (-२५.०९), शिक्षक कृती (-२५.०७), विद्यार्थी कृती (२९.१८) या घटकांमध्ये बराच फरक दिसतो.

५) प्रेरणा व हेतुकथन (४५.८७), अध्यापन-पद्धती (५४.३१), प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (-४९.९३) या घटकांमध्ये खूप फरक दिसतो.

निष्कर्ष :

१) मराठी व भूगोल पाठ मार्गदर्शनाची तुलना करता विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, मूल्यमापन, स्वाध्याय, मार्गदर्शक प्राध्यापकांचा नकारात्मक प्रतिसाद व अन्य या घटकांच्या पाठ मार्गदर्शनामध्ये कोणताही फरक नाही. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

२) प्रेरणा व हेतुकथन, अध्यापन-पद्धती या घटकाबाबत मराठी पाठ मार्गदर्शनामध्ये भूगोलाच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

३) प्राध्यापकांच्या अपेक्षात्मक कृतीचे प्रमाण भूगोल पाठ मार्गदर्शनामध्ये मराठीच्या तुलनेत जास्त आहे.

५) प्राथमिक माहिती, शैक्षणिक साधने, विषयज्ञान व विद्यार्थी कृती या घटकाबाबत मराठी पाठ मार्गदर्शनात अधिक चर्चा; तर फलक लेखन, शिक्षक कृती या घटकांबाबत भूगोल पाठ मार्गदर्शनात अधिक चर्चा होते.

मराठी व शास्त्र अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शन --

मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शन घटकांतील फरकाचे तौलनिक दर्शांक सारणी क्र. ४.२११ मध्ये दिलेले आहेत.

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

फरकाच्या तौलनिक दर्शकांक सारणीचे निरीक्षण केले असता मराठी व शास्त्र या दोन विषयांमध्ये दिल्या जाणाऱ्या पाठ मार्गदर्शनाचे चित्र पुढील प्रमाणे दिसते. १) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (०.००), विषयज्ञान (०.५८), स्वाध्याय (६.३६ ), फलक लेखन (६.८९), विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (७.११) या घटकांमध्ये मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये फरक नाही. याचा अर्थ साम्य दिसते.

२) शांतता काळ (१७.२४ ), मार्गदर्शक प्राध्यापकांचा नकारात्मक प्रतिसाद (-१४.४४ ) या घटकांमध्ये अल्प प्रमाणात फरक आहे. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

३) पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (२१.३६ ) व अध्यापनपद्धती (-२८.८७) व अन्य (२९.०० ) या घटकांमध्ये पुरेसा फरक दिसतो.

४) प्राथमिक माहिती (३१.५० ), मूल्यमापन (३०.९६ ), प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (३२.४५ ) या घटकांमध्ये बराच फरक आहे.

५) शैक्षणिक साधनांचा वापर (-८३.७४ ) ,प्रेरणा व हेतुकथन (-८२.०३ ), प्रश्न पद्धती (-६१.७९ ), शिक्षक कृती (-८४.२९ ), विद्यार्थीकृती (-४१.१४ ), मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद (४२.२९ ) खूपच फरक दिसतो.

सारणी क्र. ४.२३५

मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शन तुलना

| घटक → / विषय ↓ | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पद्धती | प्रश्न पद्धती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अवहारात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| मराठी | ०.२९ | २. | १.२७ | २.०३ | ४.१२ | १०.२२ | ६.७४ | २.३२ | २.६७ | ६.६२ | २.०९ | ६.३३ | १.५७ | २.९ | ७.६१ | २३.४७ | १२.५५ | ३.६ | ०.५२ |
| शास्त्र | ०.२४ | २.३७ | १.२७ | ३.७३ | ७.५ | १०.१६ | ५.३ | २.५५ | ४.३२ | १२.२ | २.५५ | ४.३७ | १.४७ | २.७ | ५.१४ | २१.८ | ७.४६ | ४.१२ | ०.३९ |
| तौलनिक टक्केवारीचा दर्शांक | १७.२४ | ३१.५ | ० | -८३.७४ | -८२.०३ | ०.५८ | २१.३६ | -२८.८७ | -६१.७९ | -८४.२९ | -४१.१४ | ३०.९६ | ६.३६ | ६.८९ | ३२.८५ | ७.११ | ४२.३९ | -१४.४४ | २९. |

निष्कर्ष :

१) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, विषयज्ञान, स्वाध्याय, फलक लेखन, विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद या घटकांबाबत मराठी व शास्त्र पाठ मार्गदर्शनामध्ये कोणताही फरक नाही. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

२) शैक्षणिक साधनांचा वापर, प्रेरणा व हेतुकथन, प्रश्न पद्धती, शिक्षक कृती, विद्यार्थी कृती या घटकांबाबत शास्त्र पाठ मार्गदर्शनात मराठीच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

३) मार्गदर्शक प्राध्यापकांच्या होकारात्मक प्रतिसादाचे प्रमाण मराठी पाठ मार्गदर्शनात शास्त्राच्या तुलनेत जास्त आहे.

४) पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे, प्राथमिक माहिती, मुल्यमापन या घटकांवर मराठीमध्ये अधिक चर्चा तर अध्यापनपद्धतीवर शास्त्रामध्ये अधिक चर्चा होते.

५) प्राध्यापकांच्या अपेक्षात्मक कृतीचे प्रमाण मराठीमध्ये शास्त्राच्या तुलनेत जास्त होते.

मराठी व गणित अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शन --

मराठी व गणित पाठ मार्गदर्शन घटकातील फरकाचे तौलनिक दर्शकांक सारणी क्र. ४.३०० मध्ये दिलेले आहेत.

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

फरकाच्या दर्शकांक सारणीचे निरीक्षण केले असता मराठी व गणित या दोन विषयांमध्ये दिल्या जाणाऱ्या पाठ मार्गदर्शनाचे चित्र पुढील प्रमाणे दिसते.

## सारणी क्र. ~~४.२५७~~ ४.३००

### मराठी व गणित पाठ मार्गदर्शन तुलना

| घटक → / विषय ↓ | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| मराठी | ०.२९ | २. | १.२७ | २.०३ | ४.१२ | १०.२२ | ६.७४ | २.३२ | २.६७ | ६.६२ | २.०९ | ६.३३ | १.५७ | २.९ | ७.६१ | २३.४७ | १२.९९ | ३.६ | ०.५२ |
| गणित | ०.२ | १.१ | ०.८ | ०.९ | ७.१ | ९.७ | ४.० | २.४ | ४.४ | १०.१ | २.७ | ४.७ | १.१ | १.८ | ८.८ | २३.३ | ९.१ | ४.५ | ०.४ |
| तौलनिक टक्केवारीचा दर्शांक | ३१.०३ | ४५. | ३७. | ५५.६६ | -७२.३३ | ५.०८ | ४०.६५ | -३.४४ | -६४.७९ | -५२.५६ | -२९.१८ | २५.७५ | २९.९३ | ३७.९३ | -१५.६३ | ७.७९ | २९.७२ | -२५. | २३.०७ |

१) विषयज्ञान (५.०८), अध्यापनपद्धती (-३.४४ ), विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (७.७९) या घटकामध्ये मराठी व गणित पाठ मार्गदर्शनामध्ये फरक नाही. याचा अर्थ साम्य आहे.

२) प्राध्यापक अपेक्षात्मक कृती (-१५.६३) या घटकामध्ये अल्प प्रमाणात फरक आहे. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

३) अन्य (२३.०७) मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद (-२५.००), मूल्यमापन (२५.७५ ) या घटकांमध्ये पुरेसा फरक आहे.

४) शांतता काळ (३१.०३), विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (३७.००), विद्यार्थीकृती (-२९.१८), स्वाध्याय (२९.९३), फलक लेखन (३७.९३), मार्गदर्शक प्राध्यापकांचा होकारात्मक प्रतिसाद (२९.७२) या घटकांमध्ये बराच फरक आहे.

५) प्राथमिक माहिती (४५.००), शैक्षणिक साधनांचा वापर(५५.६६), प्रेरणा व हेतुकथन (-७२.३३), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (४०.६५), प्रश्न पद्धती (-६४.७९), शिक्षक कृती (-५२.५६) या घटकांमधील मराठी पाठ मार्गदर्शन व गणित पाठ मार्गदर्शन यात - खूपच फरक आहे.

निष्कर्ष :

१) मराठी व गणित पाठ मार्गदर्शनाची तुलना करता विषयज्ञान, अध्यापनपद्धती, विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद या घटकांच्याबाबत मराठी व गणित पाठ मार्गदर्शनामध्ये कोणताही फरक नाही. याचा अर्थ बरेच साम्य आहे.

२) प्राथमिक माहिती, शैक्षणिक साधनांचा वापर, पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकांबाबत मराठी पाठ मार्गदर्शनात गणिताच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

३) प्रेरणा व हेतुकथन, प्रश्न पद्धती, शिक्षक कृती या घटकांबाबत गणित पाठ मार्गदर्शनात मराठीच्या तुलनेत अधिक चर्चा होते.

४) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, मूल्यमापन, स्वाध्याय, फलक लेखन या घटकांवर मराठीमध्ये अधिक चर्चा; तर विद्यार्थी कृती या घटकावर गणितामध्ये अधिक चर्चा होते.

५) मार्गदर्शक प्राध्यापकांचा होकारात्मक प्रतिसाद मराठीमध्ये गणिताच्या तुलनेत जास्त आहे; तर मार्गदर्शक प्राध्यापकांचा नकारात्मक प्रतिसाद गणितामध्ये अधिक आहे.